# किंग लिअर - विल्यम शेक्सपिअर

मराठी कथारूप अनुवादः डॉ. प्रा. बिंदुमाधव जोशी

**<u>प्रास्ताविक</u>**

विल्यम शेक्सपियरचा जन्म १५६४ मध्ये Straford-on Avon या छोट्या गावी झाला. त्याच्या पूर्वायुष्याबद्दल फारशी माहिती मिळत नाही. १६ व्या वर्षी एका गंभीर चोरीच्या आरोपामुळे तो गाव सोडून लंडनला आला. तेथे १५९३ पर्यंत, पहिली १२/१३ वर्षे त्याने काय केले याची माहिती कुठेही उपलब्ध नाही. त्या काळात त्याने जीवनाचा खूप अनुभव मिळवला असला पाहिजे व बरेच निरीक्षण केले असले पाहिजे असे त्याच्या नाटकांवरून जाणवते. १९९३ च्या सुमारास त्याने आपली पहिली नाटक कंपनी स्थापन केली - Queen's Men. इंग्लंडची राणी एलिझाबेथ-१ हिचा राजाश्रय त्याला लाभला. नट, दिग्दर्शक, व नाटककार या तिन्ही आघाड्यांवर त्याने अतुल यश मिळवून लोकाश्रय मिळवला. नाटक हे त्या वेळचे एकमेव प्रमुख करमणुकीचे साधन होते.

प्रत्येक प्रास्ताविकात आपण शेक्सपियरविषयी अशी थोडी थोडी माहिती मिळवत जाऊ.

<u>किंग लिअर</u>

मोठ्या पदावर असलेल्या व्यक्तीच्या स्वभावात एखादा दोष अतिरिक्त प्रमाणात असला व त्याला परिस्थितीची थोडी जरी मदत मिळाली तर केवढी भीषण शोकांतिका होऊ शकते याचे ’किंग लिअर’ हे ज्वलंत उदाहरण. कुसुमाग्रज यांचे ’नटसम्राट’ नाटक बरेचसे ’किंग लिअर’ वर आधारलेले आहे.

**<u>पात्र-परिचय</u>**

| | |
|---|---|
| लिअरः | इंग्लंडचा राजा, वृद्ध व हेकेखोर. |
| गोनेरिल, रेगन, व कॉर्डेलियाः | लिअरच्या ३ मुली |
| आल्बनीः | गोनेरिलचा पती |
| कॉर्नवॉलः | रेगनचा पती |
| केंटः | लिअरचा इमानी सरदार/सेवक |
| ग्ल्यूस्टरः | लिअरचा विश्वासू सरदार |
| एडगरः | ग्ल्यूस्टरचा औरस पुत्र |
| एड्मंडः | ग्ल्यूस्टरचा अनौरस पुत्र |

**<u>कथानकः</u>**

इंग्लंडचा राजा किंग लिअर वृध्दापकाळामुळे आपले राज्य तिन्ही मुलीत वाटून त्यांच्या प्रेमाच्या छायेत शांत निवांत जीवन व्यतीत करायचे ठरवतो. तिन्ही मुलींना तो जवळ बोलावतो. आपल्यावर कोणाचे जास्त प्रेम आहे हे जाणून घेण्याची ’साठी बुध्दी नाठी’ इच्छा त्याला होते. त्याच्या दोन्ही

थोरल्या मुली स्वार्थी व गोडबोल्या असतात. त्यांचे बापावर जराही प्रेम नसते. राजा सर्वात थोरल्या मुलीला गोनेरिलला विचारतो, ’तुला सर्वात प्रिय कोण?’ ती उत्तरते, ’बाबा तुम्हीच’.

लिअर दुसरी मुलगी रेगन हिला तोच प्रश्न विचारतो; तीही म्हणते, ’अर्थात बाबा, तुम्हीच!’ खूष झालेला लिअर त्या दोघींना राज्याचा एकेक वाटा देतो. लाडक्या धाकट्या मुलीला - कॉर्डेलियाला - लिअर तोच प्रश्न विचारतो. तिचे बापावर खूप प्रेम असते, पण ती प्रामाणिक असते. ती म्हणते, ’माझे ज्याच्याशी लग्न होईल तो मला सर्वात प्रिय असेल, पण त्यानंतर नंबर तुमचाच’. तिच्या या उत्तराने नाखूष झालेला लिअर तिच्या वाट्याचा तिसरा भाग तिला न देता थोरल्या दोघींना सारखा वाटून देतो. ती न चिडता बापाचा निर्णय स्वीकारते. तिचे प्रामाणिक उत्तर ऐकून खूष झालेला फ्रान्सचा राजा तिला पत्नी म्हणून स्वीकारतो व पॅरिसला घेऊन जातो.

लिअरचे हे वागणे त्याचा इमानी सरदार केंट [अर्ल ऑफ केंट] याला पसंत पडत नाही. तो कॉर्डेलियाच्या बाजूने रदबदली करायचा प्रयत्न करतो. पण दिखाऊ प्रेमाला बळी पडलेला लिअर त्याचे ऐकत नाही; उलट त्यालाच ५ वर्षे हद्दपारीची शिक्षा देतो.

ठरल्याप्रमाणे लिअर गोनेरिलकडे पहिला एक महिना राहण्यासाठी आपले १०० सरदार [सेवक] घेऊन येतो. थोड्याच दिवसात ती आपले खरे रंग दाखवू लागते. स्वतः तर ती त्याच्याकडे दुर्लक्ष करतेच, पण नोकरांच्या करवीही त्याचा उपमर्द होईल असे वागण्याची त्यांना फूस देते. लिअर पूर्वीच्या राजाच्या गुर्मीत अधिकार गाजवू पाहतो. त्यामुळे तो सर्वांना अप्रिय होतो. त्याच्या गैरहजेरीत Old fool अशी त्याची संभावना होऊ लागते. दरम्यान केंट वेषांतर करून त्याचा नोकर म्हणून त्याच्याजवळ राहावयास येतो.

त्याच्या रोजरोजच्या त्रासाला कंटाळलेली गोनेरिल त्याच्या सरदारांची संख्या ५० वर आणण्याचे सुचवते. राजा खोट्या प्रतिष्ठेपायी आपल्या सरदारांची संख्या कमी करायला तयार होत नाही. सर्वांच्याकडून मिळणारी अपमानास्पद वागणूक सहन न होऊन लिअर मुलीला जाब विचारण्यासाठी तिची भेट मागतो. आधी ती डोके दुखते आहे असे सांगून भेट टाळते; नंतर भेटीत उडवाउडवीची उत्तरे देऊन त्याच्या तक्रारीकडे दुर्लक्ष करते व सरदारांची संख्या कमी करण्याचा आग्रह धरते. राजाचा हटवादीपणा व गोनेरिलचा तुटकपणा यामुळे परिस्थिती टोकाला जाते. लिअर तावातावाने १५ दिवसातच तिचे घर सोडून दुसऱ्या मुलीकडे - रेगनकडे - जायचे ठरवतो. गोनेरिल त्याला अडवायचा जराही प्रयत्न करत नाही. उलट तो घरातून निघताच त्याच्या पाठोपाठ आपल्या नोकराला बहिणीकडे पाठवून सर्व रिपोर्ट व सूचना कळवते. रेगन थोरल्या बहिणीपेक्षा सवाई निघते. बापाला टाळण्यासाठी ती आपले घर सोडून कॉर्नवॉलसह ग्लूस्टरकडे पाहुणी म्हणून राहायला येते. लिअर व सर्व परिवार रेगनकडे ग्लूस्टरच्या घरी येतो.

राजाबरोबर केंटही निघतो व आधीच ग्लूस्टरच्या घरी पोचतो. गोनेरिलच्या नोकराशी त्याचा वाद होतो, त्यामुळे रेगनचा पति कॉर्नवॉल [ड्यूक ऑफ कॉर्नवॉल] त्याला खोड्यात अडकवतो. लिअर तेथे येऊन पोचतो आणि आपल्या नोकराला खोड्यात अडकवलेला पाहताच खवळतो. रेगन व

तिचा पती थंडपणे त्याचे स्वागत करतात व १५ दिवस आधी त्याची व्यवस्था करायला स्वच्छ नकार देतात. बिचाऱ्या लिअरची अवस्था ना घरका ना घाटका अशी होते. ते दोघे त्याच्या सरदारांची संख्या कमी करायचा आग्रह धरतात. त्याचवेळी गोनेरिल तेथे येते. रेगन बापाने राहिलेले १५ दिवस गोनेरिलकडे राहावे आणि मगच आपल्याकडे यावे असा आग्रह धरते, तर गोनेरिल बापाने फक्त एकट्याने, सर्व सरदार कमी करून, आपल्याकडे राहायला यावे अशी मागणी करते. रेगनही तिचे हे म्हणणे उचलून धरते. त्यांचे म्हणणे आमचे नोकर असताना राजाला स्वतंत्र सेवकांची गरजच काय? दोघींच्या या रस्सीखेचात लिअर आपला उपमर्द सहन न होऊन संतापाने बेभान झालेला असा घराबाहेर पडतो, व उघडा बोडका भ्रमिष्टासारखा रानोमाळ भटकू लागतो. त्याचवेळी त्याच्या भावनांना प्रतिसाद देणारे वीज, वारा, व पाऊस यांचे तुफान सुरू होते. कृतघ्न मुलीपेक्षा हे तुफान परवडले असे म्हणत लिअर भटकत राहतो व झंझावातात सापडून बेशुध्द होऊन पडतो. त्याच्या पाठोपाठ आलेला त्याचा इमानी सेवक केंट त्याला सावरतो. एका झोपडीमध्ये थोडी विश्रांती घेऊन केंट राजाला फ्रान्सच्या दिशेने डोव्हरकडे दिशेने घेऊन वाटचाल सुरु करतो.

दरम्यान वडिलांची दुरवस्था ऐकून त्यांना सोडवण्यासाठी त्यांची धाकटी मुलगी कॉर्डेलिया सैन्य घेऊन इंग्लंडच्या दक्षिण किनाऱ्यावर डोव्हरजवळ उतरते. लिअरची व तिची भेट होते. मृत्यूच्या दारात पोचलेला भ्रमिष्ट वेडा लिअर तिच्या प्रेमळ शुश्रुषेने परत ताजातवाना होतो. पण इंग्लीश सेनेचा सेनापती एडमंड [ग्लूस्टरचा अनौरस पुत्र] फ्रेंच सेनेचा पराभव करतो आणि कॉर्डेलिया व लिअर यांना बंदिवान करतो. त्याच्याच आज्ञेने कॉर्डेलियाला फाशी दिले जाते व तिचा मृत देह हातात घेऊन लिअर रडत रडत सर्वांसमोर येतो. आपल्या अश्रूंनी तिचा चेहरा भिजवत तो खाली कोसळतो आणि मरतो.

लिअरच्या कथेमध्ये त्याचा विश्वासू सरदार ग्ल्युस्टर [अर्ल ऑफ ग्ल्यूस्टर] याचीही शोककथा गुंफली आहे. ग्ल्यूस्टरचा अनौरस पुत्र एडमंड आपल्या औरस भावाशी कपट करून त्याला व वडिलांना फसवतो; त्यांची सर्व मालमत्ता हडप करून एडगरला देशोधडीला लावतो. रेगन व गोनेरिल ग्ल्युस्टरकडे पाहुणे म्हणून राहायला येतात त्यावेळी एडमंड त्या दोघींशी प्रेमाचे नाटक करून त्यांना फसवतो. पण त्याने गोनेरिलला पाठवलेल्या एका प्रेमपत्रामुळे गोनेरिलचा पती आल्बनी [ड्यूक ऑफ आल्बनी] याला त्याचा हा प्रेमप्रकार कळलो व हे नाटक उघडकीला येते. बदनाम झालेली गोनेरिल रेगनच्या विषप्रयोगाला बळी पडते व रेगन स्वतः वैफल्याच्या दुखा:तून आत्महत्या करते.

वादळात बाहेर पडलेला आपला बाप मरावा अशीच रेगन व गोनेरिलची इच्छा असते, पण इमानी ग्ल्यूस्टर केंटच्या मदतीने त्याला वाचवून, मदत करून परत येतो. यामुळे चिडलेले रेगन व कॉर्नवॉल एडमंडने आणखी आगीत तेल घातल्यानंतर ग्ल्युस्टरचे डोळे काढण्याचा प्रयत्न करतात. ग्ल्यूस्टरचा इमानी सेवक त्याला वाचवायला पुढे येतो. झटापटीत ग्ल्यूस्टर आपले डोळे गमावतो पण कॉर्नवॉलही मारला जातो. आंधळा ग्ल्यूस्टर माळरानात भटकत असताना त्याचा औरस पुत्र

एडगर [जो भिकाऱ्यासारखा फाटक्या कपड्यात झोपडीत रहात असतो आणि ज्याने आधी लिअरलाही आधार दिलेला असतो] त्याला भेटतो. आपल्या आंधळया बापाला एडगर लिअरकडे डोव्हरला घेऊन जातो.

अंध वडिलांना डोव्हरपर्यंत सुखरूप आणल्यानंतर एडगर आपली ओळख त्याना पटवून देतो. आपल्याला भोगावा लागलेला दु:खाचा भाग कथन करतो. आपल्या मुलाला आपल्यामुळे खूप दु:ख सोसावे लागले हे जाणून पश्चात्तापदग्ध ग्ल्यूस्टर त्याच्या बाहुपाशात प्राण सोडतो.

एडमंडच्या खऱ्या स्वरूपाचे ज्ञान झालेला एडगर वडिलांच्या मृत्यूनंतर त्याला द्वंद्वयुध्दाचे आव्हान देतो; त्यात एडगर त्याला प्राणांतिक जखमी करतो. मरता मरता एडमंडला लिअरची आठवण होते. तो लिअरला आणि कॉर्डेलियाला वाचवण्याची विनंती करतो. दोघांनाही थोड्या वेळापूर्वीच फासावर चढवण्याची आज्ञा त्याने दिलेली असते. दुर्दैवाने त्याच्या पश्चात्तापाला खूप उशीर झालेला असतो. धावाधाव होते पण थोड्याच वेळात आपल्या लाडक्या लेकीचा मृतदेह घेऊन लिअर तेथे प्रवेश करतो आणि शोकावेगाने खाली कोसळतो.

वृध्द लिअरच्या एककल्ली हट्टी स्वभावामुळे त्याच्या तिन्ही मुली, ग्ल्यूस्टर, एडमंड, रेगनचा पती कॉर्नवॉल, व त्याचा विश्वासू नोकर केंट या सर्वांना मृत्युमुखी पाठवून लिअर स्वत:ही मरतो. केवढी ही शोकांतिका!

आपणा ज्येष्ठ नागरिकांना लिअरच्या या शोकांतिकेपासून दोन धडे घेण्यासारखे आहेत: लिअरसारखी आपली सत्ता व संपत्ती मृत्यूपूर्वी पूर्णपणे आपल्या मुलांच्या हातात सोपवू नका व स्वत:ला अनाथ बनवू नका. दुसरे म्हणजे आपल्या मुलाकडे अथवा मुलीकडे राहायला गेलात तर आपला हट्ट न चालवता त्यांच्या कलाने घ्या.